12 APR 2018 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संवेदनशील विषयांबाबत चर्चा आवश्यक

## डॉ. डोरेने : विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विधी कार्यशाळेस प्रारंभ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जागतिक स्तरावर आज अत्यंत चिंताजनक वातावरण निर्माण झाले आहे. जागतिक समुदायाला भेडसावणारे अनेक प्रश्न मानवजातीसमोर उभे ठाकले आहेत. अस्तित्वाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर या समग्र संवेदनशील विषयांवर सांगोपांग चर्चा होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील फ्लोरिडा स्टेट युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ लॉ येथील ज्येष्ठ तज्ज्ञ डॉ. जॉन वॉलेस वॅन डोरेने यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागामार्फत बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील व्हर्च्युअल क्लासरूममध्ये चौदा दिवसीय (१० ते २४ एप्रिल) आंतरराष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात डॉ. वॅन डोरेने बोलत होते. हुबळीच्या कर्नाटका स्टेट लॉ युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. सी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते.

डॉ. वॅन डोरेने म्हणाले, जगातील सध्याच्या घडामोडींसह भ्रष्टाचार, फाशीची शिक्षा, समलैंगिक अधिकार, गर्भपात, बोलण्याचा व निषेध करण्याचा अधिकार, धर्मनिरपेक्ष राष्ट्र आणि अल्पसंख्याकांच्या अधिकारांचे संरक्षण, स्थलांतर यासारखे अनेक संवेदनशील विषय आपल्यासमोर आहेत. त्यांच्याविषयी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू झालेल्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. जॉन वॉलेस वॅन डोरेने. सोबत डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, कुलगुरू डॉ. सी. एस. पाटील आणि डॉ. जी. एम. वाघ.

जागतिक स्तरावर सकारात्मक चर्चा होऊन योग्य पद्धतीचा तोडगा काढणे आवश्यक आहे. अशा चर्चेसाठी सर्वच राष्ट्रांनी तितकाच सकारात्मक प्रतिसाद देणेही अपेक्षित आहे. समताधिष्ठित जागतिक समुदायाच्या निर्मितीचे उद्दिष्ट घेऊन समस्त प्रमुख राष्ट्रांनी आता एका व्यासपीठावर येऊन संविधानिक मार्गाचा अवलंब करून दुष्प्रवृत्ती नष्ट करण्याच्या दृष्टीने भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. तसे न झाल्यास मानवजातीच्या अस्तित्वासमोरच मोठे प्रश्नचिन्ह उभे राहील.

कुलगुरू डॉ. सी. एस. पाटील म्हणाले, संविधानाप्रती अढळ विश्वास हा लोकशाहीचा खरा पाया आहे. त्यामुळेच लोकशाहीचे कामकाज सुव्यवस्थितपणे चालू आहे. भारतीय संविधान हा आपल्या देशाचा वारसाच नव्हे, तर आपल्या जीवनाचे मार्गदर्शक आहे.

आर. एल. लॉ कॉलेज, बेळगाव येथील डॉ. जी. एम. वाघ यांनीही मनोगत व्यक्त केले. विधी अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. आर. नारायणा यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 APR 2018
पुढारी

# विद्यापीठाच्या परीक्षा अंतिम टप्प्यात

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षा जवळपास संपल्या आहेत, तर कला शाखेच्या अभ्यासक्रमाच्या परीक्षाही या आठवड्यात संपतील. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा अद्याप सुरू आहेत. सर्व परीक्षा १८ मेपर्यंत संपतील. यानंतर विधी विभागाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा सुरू होतील, अशी माहिती परीक्षा विभागाकडून देण्यात आली.